## शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता अर्ज मागविण्याबाबत जाहिरात.

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act
आपली सेवा आमचे कर्तव्य


**महाराष्ट्र शासन**
**आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क आयोग,**
**नाशिक विभाग, नाशिक**
"सिंहगड" शासकीय विश्रामगृह, गोल्फ क्लब जवळ, नाशिक -४२२००२


शासकीय सेवेतून / संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-याची सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | वय, अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय सेवेतून (गट अ किंवा गट ब ) (राजपत्रित) (ग्रेड वेतन रु.५४००/- किंवा त्यापेक्षा कमी) सेवानिवृत्त झालेले अधिकारी | १. लेखा व अर्थ विषयक बाबी.<br>२. प्रशासकीय व कार्यालयीन कार्यपध्दती विषयक बाबी.<br>३. शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरीक यांचेकरीता उदबोधन वर्ग घेणे. | **वयोमर्यादा : - ५८ ते ६३ वर्ष**<br>१. महाराष्ट्र शासनातील कोणत्याही वित्त व लेखा कार्यालयातील सहायक लेखा अधिकारी किंवा त्यावरील वरीष्ठ पदाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक<br>२. महाराष्ट्र प्रशासकीय लेखा, वित्त व्यवस्थापन,अर्थसंकल्प संदर्भातील अनुभव आवश्यक<br>३. अध्यापकीय कौशल्य असणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. | १ |
| २. | शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट अ किंवा गट ब (राजपत्रित) (ग्रेड वेतन रु.५४००/- किंवा त्यापेक्षा कमी) सेवानिवृत्त झालेले अधिकारी /कर्मचारी. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवा ऑनलाईन प्रणालीवर प्रभावीपणे राबविणे, आढावा, आपले सरकार पोर्टलचे सुलभीकरण / सेवांचे संलग्नीकरण, ऑनलाईन आकडेवारीचे सांख्यिकी विश्लेषण व संकलन करणे. शासकीय विभागांशी समन्वय व माहितीचे संकलन- विश्लेषण. | **वयोमर्यादा : - ५८ ते ६३ वर्ष**<br>१. पदवीधर, संगणक सांख्यिकी विषयाचे ज्ञान<br>२. गट अ व गट ब (राजपत्रित / अराजपत्रित) पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव<br>३. Power Point सादरीकरण करण्याचे कौशल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | १ |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती:**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -२७१५/ प्र.क्र.१००/१३. दि.१७.१२.२०१६ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२. करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

Scanned with OKEN Scanner

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरीक व मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.३०.०१.२०२३ पर्यंत सादर करावेत.**

**संपर्क : - राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक विभाग, नाशिक**
**"सिंहगड" शासकीय विश्रामगृह, गोल्फ क्लब जवळ, नाशिक -४२२००२**

**दूरध्वनी क्र.** ०२५३२९९५०८०

**ई-मेल** : rtsc.nashik@gmail.com

**(सुनील जोशी)**
उपसचिव, राज्य सेवा हक्क आयोग,
नाशिक विभाग, नाशिक

Scanned with OKEN Scanner